**सं.फौ.ख.क्र. ६४२/२०२४**
**निशाणी क्र. ८**

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. १ यांचा सरतपास शपथेवर.**

**नाव:** नवनाथ आनंदराव गोलांडे,
**वय:** ४९ वर्षे, **व्यवसाय:** पोलीस कॉ. ब. नं. ५६५,
**सध्या नेमणूक:** वालचदंनगर, पो. स्टे.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु**

दिनांक २५/११/२०२३ रोजी मी वालचदंनगर पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होतो. पी.एस.आय. श्री. खंदारे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सणसर येथील भवानीनगर छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या मोकळया जागेत सणसर—निंबोडी रस्त्याच्या बाजुला कोप्याच्या आडोशाला एक इसम अवैध्य दारू विक्री करत असल्याची माहिती मिळाली. पोलीस हवालदार श्री. मोहिते व पोलीस हवालदार श्री. माने, मी तसेच दोन पंचांना बोलावून घेउन आम्हाला बातमीचा आशय समजावून सांगितले. त्यानंतर मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी खाजगी वाहनाने जाऊन सदरचे खाजगी वाहन घटनास्थळाच्या थोडया अंतरावर लावून तेथून पायी चालत जाऊन त्या ठिकाणी एक इसम त्याच्या ओळखीच्या लोकांना दारू विक्री करताना मिळून आला. त्याला आमची चाहूल लागताच तो पळून गेला. त्याला आम्ही ओळखत असल्याने त्यास आवाज दिला. त्यानंतर त्या ठिकाणी हातभट्टीची ४ लिटर दारू असा एकूण ४००/— किंमतीची माल मिळून आला. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष पंचनामा करून १८० मिली मापाच्या बाटलीत सॅमलकरिता काढून उर्वरित माल जागीच नष्ट केला. त्यानंतर मी पोलीस ठाणेत येऊन सदर इसमाविरूध्द मुंबई दारूबदी कायदा, १९४९ कलम ६५(ई) अन्वये फिर्याद दिली. आता मला फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. २१** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. एस. ए. वाकळे यांचे मार्फत शपथेवर**

२. हे म्हणणे खरे आहे की, भवानीनगर येथे साखर कारखाना असल्याने सणसर—निंबोडी रस्त्यावर दळणवळण भरपूर असते. हे म्हणणे खरे आहे की,

**सं.फौ.ख.क्र. ६४२/२०२४**
**निशाणी क्र. ८**

भवानीनगर गावची लोकसंख्या ४५०० आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाच्या बाजुला शेती आहे. मी ज्या ठिकाणी छापा टाकला होता त्या ठिकाणचा गट नंबर, चतु:सिमा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या बाजुला ऊसतोड कामगार पालं टाकून राहतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी पळून गेलेला असल्यामुळे आम्ही आरोपीस पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा वेळेस बरीच लोक जमलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचे पंच हे आमचे नेहमीचेच पंच आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पंचांच्या सहया पोलीस स्टेशनमध्ये घेतले. हे म्हणणे खरे नाही की, इतर गुन्हयातील जप्त मुद्देमाल या गुन्हयात दाखविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरूध्द खोटा गुन्हा दाखल केलेला आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

JYOTI NITIN BHASME
Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2024.10.21 14:41:26 +0530

ठिकाण इंदापूर (जे. एन. भस्मे)
दिनांक १९/१०/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.